MHAK100008762021

Cri.M.A./173/2021
**Yashsvi Umesh Rathod Vs. Umesh Kishor Rathod**

## निशानी क्रमांक ०५ खाली आदेश

१. अर्जदार हिने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ (येथून पूढे सोयीसाठी घरगुती हिसांचार कायदा असा उल्लेख करण्यात आला आहे) या कायद्यान्वये कलम १२ अन्वये मुळ अर्ज दाखल केला असून विविध मागण्यांची मागणी केली असून प्रस्तुत अर्जान्वये कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांनी सदर अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून तिला दरमहा रक्कम रुपये २५,०००/— ची मागणी केली आहे.

अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे :

२. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराची पती असून गैरअर्जदार क्र.२ सासु, क्रमांक ३ सासरा, क्रमांक ४ हा देर आहे. अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ यांचे सोबत दिनांक ०७.०५.२०१९ रोजी हिन्दु रितीरीवाजाप्रमाणे पातुर, ता.पातुर, जि.अकोला येथे झाले आहे. त्यानंतर अर्जदार हि गैरअर्जदार क्र.१ कडे मौजा गावंडगाव येथे नांदण्यास गेली असता सुरुवातीला काही दिवस सर्व गैरअर्जदारांनी अर्जदारास चांगली वागणुक दिली त्यानंतर दि.१४.०६.२०१९ पासुन गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारास त्रास देणे सुरु केले. गैरअर्जदार क्र.१ हा पोलीस खात्यामध्ये नोकरीवर असल्यामुळे त्याला गडचिरोली येथे ट्रेनिंगला जायचे आहे असे म्हणुन अर्जदार हिला त्याने गावी इतर गैरअर्जदारांच्या सानीध्यात सोडुन दिले व गैरअर्जदार क्र.१ हा गावंडगाव सोडुन नोकरीच्या ठिकाणी एकटा निघुन गेला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी अर्जदारास वडीलांकडुन ०५ लाख रुपयांची मागणी केली व अर्जदाराचे वडीलांची आर्थीक स्थिती चांगली नसल्यामुळे अर्जदाराचे वडील पैसे देउ शकले नसल्याने गैरअर्जदार क्र.२ ते ४ यांनी अर्जदार हिचा शारीरीक व मानसीक त्रास देउन खुप त्रास दिला. गैरअर्जदार क्र.१ हा बाहेर गावावरुन फोन करुन अर्जदारास मारण्याच्या धमक्या देत होता व पैशाची मागणी करीत होता व नेहमी

म्हणत होता की, मला तुझयापेक्षा जास्त चांगली मुलगी मिळाली असती. गैरअर्जदार क्र.१ ला इतर गैरअर्जदार फोन चिथावुन देत होते, त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास फोनवरुन शारीरक व मानसीक त्रास देत होता.

३.        वेळोवेळी मध्यस्थी करुन गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिला नांदण्याकरिता घेउन गेलेला नाही. तसेच तिला तिच्या पालनपोषणासाठी कुठलीही तरतुद करुन ठेवली नाही. दि.१२.११. २०१९ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला मारहारुन करुन घराबाहेर हाकलुन दिले तेव्हापासून अर्जदार हि तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती पुर्णपणे तिचे वडीलांवर अवलंबुन आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा पोलीसखात्यामध्ये नोकरी करत असुन महिन्याकाठी त्याला ६०,०००/— रुपये पगार मिळतो. तसेच गैरअर्जदर यांच्याकडे ०७ एकर बागायती शेती असुन त्यामधुन त्यांना दरवर्षी १५ लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदारावर कोणाचीही पालनपोषणाची जबाबदारी नाही. अर्जदार हिला जीवन जगण्याकरिता अन्न, वस्त्र निवारा तसेच औषधोपचाराकरिता पैशाची आवश्यकता असते. अर्जदारास उत्पन्नाचे कुठलेही साधन नसल्यामुळे ती तीचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याने तिने प्रस्तुत अर्जान्वये वरीलप्रमाणे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

<u>गैरअर्जदार यांचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे</u> :

४.    गैरअर्जदार यांनी नि.क्र.१२ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले असून विवाह मान्य केला असून बाकीचे सर्व आरोप फेटाळले आहेत. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हि स्वतःहुन कुठलेही कारण नसतांना माहेरी निघुन गेली. अर्जदारास गैरअर्जदार यांचा संसार करणे नाही या कारणामुळे अर्जदार हि तीच्या पतीला नेहमी हिन वागणूक देत असे. अर्जदार हिने लग्नाच्या दुस—याच दिवशी गैरअर्जदार क्र.१ यास म्हटले की, ‘‘माझे दुस—या मुलावर प्रेम असुन माझया वडीलांनी माझे लग्न बळजबरीने तुमच्याशी लावुन दिले आहे, मला तुमच्या कोणतीही गोडी नाही, मजा खेडयामध्ये करत नाही मला शहरात राहण्याची सवय आहे ’’. असे म्हणुन गैरअर्जदार क्र.१ यास आईवडीलापासून वेगळे काढण्यासाठी बाध्य करत होती. अर्जदार हिने गैरअर्जदार यांचेविरुध्द खोटा अर्ज दाखल करुन फारकती मिळवायची असल्याकारणाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदार हे आजही अर्जदारास नांदवण्यास तयार आहे.

५. अर्जदार हि टयुशन क्लासेस घेउन दरमहा ३०,०००/— रुपये कमावते त्याचबरोबर अर्जदार हिचे वडीलांना दरमहा ५०,०००/— पेन्शन मिळते. अर्जदार हिचा भाउ हा सुध्द शिक्षक आहे. अर्जदार स्वत:हुन माहेरी निघुन गेली असल्यामुळे स्वत: कमवीत असल्यामुळे तिला गैरअर्जदाराकडुन कुठलीही खावटी मागण्याचा अधिकार नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर म्हातारे आईवडील, आजीआजोबा तसेच लहान भाउ बहिण अवलंबुन असुन आईवडील, आजीआजोबाचे औषध उपचारासाठी त्यास खुप खर्च येतो व वेळप्रसंगी कर्ज देखील काढावे लागले आहे. अर्जदार हि स्वत:च्या मर्जीने घर सोडुन गेली असून गैरअर्जदार यांनी कोणत्याही प्रकारे तिचा छळ केला नसल्याने अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

## मुद्दे :

६. अर्जदार यांचा अर्ज व गैरअर्जदार यांचे म्हणणे वाचले तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचा निष्कर्ष खलील दिलेल्या कारणांसहित नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा घरगुती हिसांचार केला हे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करते का? | होय. |
| २. | अर्जदार पोटगी म्हणून तिला दरमहा रक्कम रुपये २५,०००/— अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ३. | काय हुकूम? | आर्थिक मदत म्हणून अर्जदार हिला दरमहा रुपये ५,०००/—. |

## यु क्ती वा द

७. अर्जदार यांचे वकील श्री.उमेश महल्ले यांनी युक्तीवाद असा केला की, गैरअर्जदार यांनी अर्जदाराला मारहाण व शिवीगाळ केली असून तिचा शारीरीक, मानसीक व भावनीक छळ केला आहे.

अर्जदार हि सध्या तिच्या माहेरी राहत असून तिचा उदरनिर्वाहासाठी गैरअर्जदाराने कोणतीही सोय केली नसून अर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अर्जदारावर उपासमारीची वेळ आली आहे. गैरअर्जदार क्रमांक १ हा पोलीस असुन त्याला महिन्याला रुपये ६०,०००/— पगार मिळतो. गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अर्जदार यांना कुठलेही उत्पन्नाचे साधन नसल्याने आर्थिक मदत म्हणून पोटगीची नितांत गरज असल्याने सदर अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून तिला दरमहा रक्कम रुपये २५,०००/— मंजुर करण्याची विनंती केली आहे. अर्जदार हिने तिचे उत्पन्नाबाबतचा तसेच दायीत्वाचा खुलासा नि.१४ खाली दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये दाखल केला आहे.

८. याउलट गैरअर्जदार यांचे वकील श्रीमती भारती देशमुख यांनी असा युक्तीवाद केला की, गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कोणताही घरगुती हिंसाचार केला नसून खोटया कथनांचा आधार घेउन अवास्तव पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार हि स्वत:हुन माहेरी निघुन गेली असल्याने ती पोटगी मिळण्यास पात्र नाही. सबब अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

## <u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्या क्रमांक १ साठी</u> :

९. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराची विस्तृत अशी व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारीरीक, मानसीक, भावनिक तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा समावेश होतो. अर्जदाराने तिच्या अर्जात म्हटले आहे की, ती नांदायला गैरअर्जदार यांच्या घरी गेली असता सर्व गैरअर्जदार हे एकत्र राहत होते. गैरअर्जदार यांनी तिला कशाप्रकारे त्रास देउन मारहाण केली हे तिने तिच्या अर्जात तारखांसहित कथन केले आहे. शिवीगाळ करुन तसेच मारहाण करणे या बाबी भावनिक व शारीरीक हिंसाचार या संज्ञेमध्ये मोडतात. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या पालनपोषणासाठी आर्थिक मदत न करणे हि बाब देखील आर्थिक हिसांचार यामध्ये बसते. अर्जदाराने तिच्या अर्जात स्पष्टपणे शिवीगाळ व मारहाण केल्याबाबत नमुद केले आहे.

१०. जरी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार हिचे अर्जातील कथन पुर्णपणे नाकारले असले तरी त्यांच्या जबाबावरुन हे दिसुन येते की, अर्जदार हि तिचे माहेरी राहत आहे. कुठलीही स्त्री तिचे लग्न झालेले घर

सोडुन कारण नसतांना माहेरी राहणार नाही त्यामुळे विनाकारण अर्जदार हि माहेरी निघुन गेल्याचे पटण्याजोगे नाही. अर्जदार हिने अर्जामध्ये तिला झालेल्या मानसीक छळाबाबत स्पष्टपणे सांगीतले असुन सद्य:स्थितीला या अर्जामध्ये पुराव्यामध्ये खोलात न उतरता प्रथमदर्शनी अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांवर अवलंबुन राहुन सदरचा अर्ज निकाली काढावा लागतो. अशा परिस्थीतीत अर्जदाराने शपथेवर कथन केलेल्या आरोपांना नाकारता येत नाही. अर्जदार हिने तिचे अर्जात स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, गैरअर्जदार हिला तिचे वडीलांकडुन पाच लाख रुपयाची मागणी करत होते. तसेच तिला मारण्याच्या धमक्या देत होते. घरेलु हिंसाचारामध्ये शारीरीक हिंसाचारासोबतच मानसीक हिंसाचार याला सुध्दा स्थान आहे.

११. अर्जदार हिने तिच्या अर्जासोबत हिंदु विवाह कायद्याचे कलम ९ प्रमाणे वैवाहिक संबंध पुर्नस्थापीत करण्याबाबतचा दावा दाखल केल्याचे दिसुन येते. त्याचबरोबर अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ याने पोलीस स्टेशन चान्नी येथे लिहुन दिलेल बयाण दाखल केलेले आहे. त्यामध्ये गैरअर्जदार क्र.१ हे मान्य केले आहे की, तो सरकारी नोकरीवर आहे तसेच त्याला राहायला सरकारी घर मिळाले नसल्यामुळे अर्जदार हिला घेउन जाउ शकला नाही. पूढे त्याने हे मान्य केले आहे की, सरकारी घर मिळाल्यानंतर तो त्याचे पत्नीला सोबत घेउन जाईल व तीची संपूर्ण जबाबदारी त्याचेवर राहील. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार हि नांदण्यास तयार असतांनाही गैरअर्जदार क्र.१ हे तिला स्वत:हुन सोबत घेउन गेले नव्हते. त्याचबरोबर त्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला नांदवण्याकरिता कुठले प्रयत्न केले हे दाखविणारे दस्त अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे व तसेच अर्जदार हि जेव्हापासून माहेरी राहते त्यादिवसापासून आजपर्यंत गैरअर्जदार यांनी तिची राहण्याची तसेच खाण्यापिण्याची कुठलीही सोय केल्याचे दिसुन येत नाही किंवा आर्थीक मोबदला दिल्याचे दिसुन येत नाही. अशा परिस्थीती गैरअर्जदार क्र.१ याने जाणुनबुजून अर्जदाराची जबाबदारी टाळत आहे. त्यामुळे वरील विवेचनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारीरीक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ करुन घरगुती हिंसाचार केला आहे. त्यामुळे मी मुद्या क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ साठी</u> :

१२. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा घरगुती छळ केला आहे हे सकृतदर्शनी निष्कर्ष नोंदवल्यानंतर अर्जदार तिला आर्थिक मदत म्हणून रुपये २५,०००/— मिळण्यास पात्र आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. अर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्र तसेच नि.१४ वर दाखल असलेले त्यांचे संपत्ती व दायीत्वाचे विवरण याचे अवलोन केले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्रमांक १ हा पोलीस असुन त्याला महिन्याला रुपये ६०,०००/— पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार यांच्याकडे मौजे गावंडगाव येथे सर्वे नं.३/२ मध्ये ०१हेक्टर ६२ आर एवढी शेती असुन त्यातुन वार्षीक ०८ लाखापर्यंत उत्पन्न मिळते असे सांगीतले. याउलट गैरअर्जदार क्र.१ यांनी ते पोलीस दलात कार्यरत असल्याबाबतचा मजकुर मान्य केला परंतु शेती नसल्याबाबत सांगीतले. गैरअर्जदार यांना वेळोवेळी संधी देउनही गैरअर्जदार यांनी त्यांचे उत्पन्न व दायीत्वाचा प्रतिज्ञालेख अभिलेखावर दाखल केला नाही. त्याउलट अर्जदार हिने सर्वे नंबर सहित गैरअर्जदाराची शेती कोठे आहे याबाबतचा खुलासा केला. गैरअर्जदाराने जरी अर्जदार हि टयुशन केल्याबाबतचे विधान केले असले तरी त्यबाबतचा कुठलाही प्रथमदर्शनी पुरावा गैरअर्जदार अभिलेखावर दाखल करु शकले नाही. त्यामुळे त्यांच्या या विधानावर विश्वास ठेवता येणार नाही. एकंदरीत गैरअर्जदार व त्यांचा उत्पनाचा व दायीत्वाचा प्रतिज्ञालेख अभिलेखावर दाखल न करु शकल्यामुळे अर्जदार हिने दाखल केलेले प्रतिज्ञालेखावर कुठल्याही प्रकारची शंका निर्माण होत नाही.

१३. गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा ठोस पूरावा जरी अभिलेखावर अर्जदाराने दाखल केला नसला तरी गैरअर्जदाराने मान्य केल्याप्रमाणे तो पोलीस दलात असुन त्याला दरमहा रुपये २०,०००/— पगार मिळतो. अर्जदाराचे सांगण्यानुसार गैरर्जदार यांच्याकडे शेती असुन त्यातुन अदाजे ०८ लाख रुपये उत्पन्न मिळते. जरी त्याबाबतचा सातबारा अभिलेखावर उपलब्ध नसला तरी अर्जदार हिच्या म्हणण्यावर विश्वास न ठेवण्यासारखे कुठलेही कारण दिसुन येत नाही. सर्वसामान्य शेतकरी ०१ हेक्टर ६२ आर एवढया शेतीतून वर्षाकाठी अंदाजे दोन ते तीन लाख रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार हि गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी या नात्याने अर्जदाराची पालनपोषणाची व्यवस्था करणे याची सर्वस्वी नैतिक व कायदेशीर जबाबदारी हि गैरअर्जदार क्रमांक १ यांचीच असून ती त्यांनी पार पाडली हे अभिलेखावरुन दिसून येत नाही. तसेच अर्जदार हिच्याकडे उदरनिर्वाहाकरिता कुठलेही उत्पनाचे साधन दिसुन येत नाही. एकंदरीतच अशा परिस्थीतीमध्ये पालनपोषणसाठी लागणार खर्च व जबाबदा—या लक्षात घेता गै.अ.क्र.१

हा अर्जदार हिला खावटी देण्यास पात्र दिसुन येतो.

१४. घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २० अन्वये न्यायालय अर्जदाराला आर्थिक मदत म्हणून अंतरिम आदेश पारित करु शकते. अर्जदार हिला तिच्या पालनपोषणासाठी तसेच दैनंदिन लागणारा खर्च, वैद्यकीय उपचारासाठी लागणारा खर्च या बाबींचा विचार करता तसेच गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती पाहता गैरअर्जदार क्रमांक १ यांनी आर्थिक मदत म्हणून अर्जदार हिला दरमहा रुपये ५,०००/— दयावेत असा आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. करिता मी मुद्या क्रमांक २ चा निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदवत आहे व मुद्या क्रमांक ३ करिता खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्रमांक १ याने अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक १६.०७.२०२१ पासून ते अर्जाचा निकाल लागेपर्यत घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २० अन्वये अर्जदार हिला दरमहा रुपये ५,०००/—(रुपये पाच हजार) आर्थिक मदत म्हणून दयावे असा आदेश देण्यात येतो.

३. अर्ज दाखल तारखेपासून ते अंतरिम अर्जावरील आदेश होणेपर्यंतची आर्थिक मदतीची एकत्रीत रक्कम हि गैरअर्जदार क्रमांक १ याने आदेश पारित झाल्यापासून ०१ महिन्याच्या आतमध्ये अर्जदारास दयावी व तेथून पुढील रक्कम हि प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये अर्जदारास दयावी असा देखील आदेश देण्यात येतो.

४. अर्जदार व गैरअर्जदार यांना सदरील आदेशाची प्रत घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २४ अन्वये विनाशुल्क देण्यात यावी.

(प्रसाद एस. ठाकरे)

दिनांक:१०.१०.२०२३.　　　　न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original .

Name of Stenographer : R. P. Khandare
Court Name : Prasad S. Thakare, Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Patur
Date : 10.10.2023
Signed by presiding officer on : 10.10.2023
Uploaded on : 11.10.2023

...